नांदगाव तालुक्यात एसटी बसला अपघात

पाच जण जखमी

नांदगाव तालुक्यात पिंपरखेड टोल नाक्याजवळ अपघातग्रस्त बस (छायाचित्र- संदीप जेजूरकर)

लोकसत्ता वृत्तविभाग

नांदगाव : नांदगाव - चाळीसगाव मार्गावरील पिंपरखेड टोल नाक्याजवळ मानव विकास योजनेअंतर्गत धावणाऱ्या एस.टी. बसचा अपघात झाला. हा अपघात होण्याआधी बस चालकाने दाखविलेली सावधगिरी कौतुकाचा विषय झाली आहे. बस चालकाने चतुराई दाखवली नसती तर खासगी वाहनातील १४ पेक्षा अधिक प्रवाशांच्या जिवावर बेतले असते.

मानव विकास योजनेअंतर्गत सुरू असलेली राज्य परिवहन महामंडळाची बस नांदगावहून न्यायडोंगरीकडे जात असताना पिंपरखेड टोल नाक्याच्या अलीकडे समोरून प्रवाशांनी भरलेले खासगी वाहन आले. या वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात बस रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यात उतरली. या अपघातात बसचा चालक स्टिअरिंगमध्ये अडकून जखमी झाला. स्थानिकांनी तत्काळ धाव घेत चालकाला सुरक्षितरित्या बाहेर काढले. त्याच्या पायाला दुखापत झाली असून चालक केशव परदेशी, वाहक अनिल आहेर यांचेसह शहादु मोरे, ताराबाई मोरे, सदू चव्हाण हे तिघे प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींना नांदगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना सोडून देण्यात आले. खासगी वाहनामध्ये १४ हून अधिक प्रवासी होते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

अपघाताची माहिती मिळताच आगार व्यवस्थापक हेमंत पगार, सहायक वाहतूक निरीक्षक राजेंद्र वाघ, सहायक वाहतूक नियंत्रक सतीश ईपर तसेच कार्यशाळा अधीक्षक सोनल खैरनार यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली. त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

सातपूरमध्ये कंपनीला आग

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : सातपूर औद्योगिक वसाहतीतील व्ही श्री एंटरप्राइझेस या कंपनीला बुधवारी सकाळी आग लागल्याने सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आगीवर नियंत्रण आणण्यात एक तासापेक्षा अधिक वेळ गेला.

गणेशनगर रस्त्यालगत टीडीके (इर्फाक) कंपनीसमोर असलेल्या व्ही श्री एंटरप्राइझेस या टिकाणी पर्यटनासाठी लागणाऱ्या बॅगा तयार करण्याचे काम चालते. बुधवारी सकाळी कारखान्यातून अचानक धूर निघू लागला. काही वेळातच धुराचे लोळ आकाशात दिसू लागल्याने धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नगरसेवक अंकिता शिंदे, माजी नगरसेवक सलीम शेख, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. कारखाना व्यवस्थापनाने महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला माहिती दिल्यावर दोन बंबांनी आग आटोक्यात आणली. आगीत कारखान्यातील काही साहित्य व उत्पादनांचे नुकसान झाले.

मालेगावात एकल महिलांचे विशेष नोंदणी अभियान

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : शहरातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता आणि अविवाहित एकल महिलांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून देण्यासाठी मालेगाव महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनाचे औचित्य साधत, महापालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागातर्फे २३ ते २९ जून या कालावधीत शहरात 'एकल महिला नोंदणी विशेष अभियान' राबविण्यात येत आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत मालेगाव महानगरपालिका हद्दीतील एकल महिलांची अचूक माहिती संकलित केली जाणार आहे. नोंदणी झालेल्या महिलांना शासनाचे आर्थिक सहाय्य, स्वावलंबन उपक्रम, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महानगरपालिका मार्गदर्शन व सहकार्य करणार आहे. महिलांना आत्मनिर्भर बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. इच्छुक पात्र महिलांनी आवश्यक कागदपत्रांसह महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाशी नोंदणीसाठी संपर्क साधावा. अथवा गुगल फॉर्मच्या लिंकवर डिजिटल नोंदणीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

एकल महिला सक्षमीकरण धोरण प्रभावीपणे राबवण्यासाठी महापालिकेने नागरिकांकडून ९९ जूनपूर्वी रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षा या विषयांवर सूचना तसेच अभिप्राय मागविले आहेत. नागरिकांना आपले अभिप्राय लेखी स्वरूपात, संबंधित ई-मेलवर किंवा दिलेल्या अधिकृत गुगल लिंकवर नोंदवता येणार आहेत. शहरातील एकही पात्र एकल महिला शासकीय योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व पात्र भगिनींनी मुदतीत आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन महापौर नसरीन बानो खालिद शेख व पालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी केले आहे.

नाशिप्रमं संस्थेचा आज गुणगौरव सोहळा

नाशिक : येथील नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळा गुरुवारी सकाळी १०.३० वाजता पुरुषोत्तम इंग्लिश स्कूलमधील धामणकर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सिन्नर येथील केएसबी पंप कंपनीचे उपाध्यक्ष सुनील बापट उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थान श्रीपाद देशपांडे भूषविणार आहेत. संस्थेच्या शाळांमधील १० वी आणि १२ वी परीक्षेतील गुणवंत व वरिष्ठ महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष मारुती कुलकर्णी, सचिव राहुल मुळे यांनी केले आहे.

motilal oswal Home Finance

मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहेजा सायन्स कॉर्नर, पस्ट एस्टेट डेव्हेलपर्स, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.
वेबसाइट: www.motilaloswalhf.com ईमेल: hfquery@motilaloswal.com

मागणी सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००० (''नियम'') आणि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''अधिनियम'') च्या तसुदीनंतर

निम्नस्वाक्षरीकार हे मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड (''ज्ञात ओस्वाल होम फायनान्स कॉर्पोरेशन लि.'' म्हणून ओळखलेले जाणारे) येथे कर्जदार असून त्यांनी सदर ओस्वाल होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. म्हणून ओळखलेल्या कर्जदाराने आणि नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत खाते करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर अधिकारांतील अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना पाठवली त्याचा खातेनिहाय कर्जदाराचे नाव/सह-कर्जदार/जामीनदार यांचे नाव, कर्ज खाते क्रमांक, मागणी सूचनेची तारीख आणि नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत खाते करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना पाठवली त्याचा खातेनिहाय कर्जदाराचे नाव/सह-कर्जदार/जामीनदार यांचे नाव, कर्ज खाते क्रमांक, मागणी सूचनेची तारीख आणि थकबाकी खाली नमूद केलेली आहे. सदर सूचनेतील कर्जदारांनी सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करायचे अवधान करण्यात येते आहे. कृपया कर्जदारांने याकडे लक्ष द्यावे की एन्फोर्समेण्ट रूल्स २००० च्या नियम ९ सहवाचता नियमित काराद्वारा सदर सूचना ३ सुप्रसिद्ध कर्जदारांचे अथवा खातेदारांच्या अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या अथवा त्यांच्या प्रतिनिधींच्या निवासी अथवा व्यवसायाच्या ठिकाणाच्या ठळकपणे दर्शविणाऱ्या ठिकाणी ठळकपणे चिकटवून बजावण्यात आली होती.

वित्तीय मालमत्तांचे कर्जदारांनी दायित्वांची पूर्तता न केल्याने मालमत्तांबाबत अधिनियमाचे अनुच्छेद १३(८) अंतर्गत उपलब्ध असलेल्या सदर कर्जाचे उपलब्ध सोडविण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध असलेल्या सुरक्षित मालमत्तांच्या विक्रीसाठी वेळेच्या मर्यादेत निवडीसाठी उपलब्ध असलेल्या सदर कर्जाचे